# प्रेसनोट

दि. १४/०२/२०२३

### महावितरण कार्यालय, रास्ता पेठ, पुणे येथील विधी सल्लागार व सहायक विधी अधिकारी यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ६१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) सत्यजीत विक्रम पवार, विधी सल्लागार, वर्ग १, महावितरण कार्यालय, रास्ता पेठ, पुणे.<br>२) समीर रामनाथ चव्हाण, सहायक विधी अधिकारी, वर्ग १, गणेशखिंड महावितरण कार्यालय, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४०,०००/- रुपये. |
| पडताळणी दिनांक | १८/०१/२०२३ व १९/०१/२०२३ |
| सापळा दिनांक | १४/०२/२०२३ |

ठिकाण :- रास्ता पेठ, महावितरण कार्यालय, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांना त्यांच्या नवीन इमारतीमध्ये ११ इलेक्ट्रिक मीटर्स घेण्याकरीता केलेल्या अर्जावर हरकत घेतली होती. त्या हरकतीवर अनुकूल अहवाल देण्याकरीता महावितरण मधील लोकसेवक सत्यजीत पवार व समीर चव्हाण यांनी तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता महावितरण मधील लोकसेवक सत्यजीत पवार व समीर चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे ४० हजार रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारल्यावर दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner